# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-१७६ दिनांक - ०६/०५/२०२४

**घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीतास ४८ तासाचे आत अटक करुन, एकुण- २७,६५,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.**

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.२४/०४/०२४ रोजी २२:००वा. ते दि.२५/०४/२०२४ रोजी ०६:००वा.चे दरम्यान निलप्रकाश बंगलो, राम मंदीर लेन, वर्तक वार्ड, डोंगरपाडा, विरार(प.), ता.वसई, जि.पालघर येथील तक्रारदार यांचे राहते बंगल्याचे गॅलरीच्या दरवाजाचे लॉक कोणीतरी अज्ञात चोरटयाने उचकटून त्यावाटे बंगल्यात आत प्रवेश करुन, बंगल्यातील बेडरुममधील कपाटामध्ये असलेले एकुण- ४७०.०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा मुद्देमाल घरफोडी चोरी करुन चोरुन नेले बाबत तक्रारदार- श्री.सौरभ निलप्रकाश चौधरी, वय-३५ वर्षे,ार . निलप्रकाश बंगलो, डोंगरपाडा, विरार(प.), ता.वसई यांचे तक्रारीवरुन विरार पो.ठाणे, गु.रजि.नं. I ३२२/२०२४, भा.दं.वि.सं. कलम-३८०,४५४,४५७ प्रमाणे दि.२५/०४/२०२४ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच घटनास्थळी भेट देवुन, मा.वरिष्ठांचे मागदर्शनाखाली लागलीच चार वेग-वेगळी पथके तयार करुन, गुन्हयाचे घटनास्थळाचे आजुबाजुस मिळालेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजचे बारकाईने निरीक्षण करुन, त्याआधारे संशयीत आरोपीत निष्पन्न झाला. नमुद संशयीत आरोपीत याचा शोध घेणे कामी, अंदाजे १०० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बारकाईने तपासुन त्याआधारे आरोपीताचा पाठलाग करत असतांना, आरोपीत याने विरार ते बोरीवली लोकल ट्रेनने, बोरीवली येथुन मानपाडा, ठाणे पावेतो बसने व तेथुन पुढे रिक्षाने प्रवास केल्याचे दिसुन आले. नमुद संशयीत आरोपीत हा शेवट रिक्षातुन उतरलेल्या ठिकाणी असलेल्या ३०० ते ४०० झोपडपट्ट्यांमध्ये शोध घेणे अडचणीचे असतांना, नमुद आरोपीताचा सदर परिसरात बुध्दकौशल्याने शोध घेतला असता, नमुद आरोपीत हा वसंतविहार, मानपाडा, ठाणे येथील असल्याची खात्री झाल्याने, लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन शिताफिने आरोपीत नामे. सोनु शेख, वय-४३ वर्षे, रा.मानपाडा, ठाणे यास ४८ तासाचे आत ताब्यात घेवुन, त्यास दि.२७/०४/२०२४ रोजी नमुद गुन्हयात अटक केली आहे.

नमुद आरोपीताचे चौकशी दरम्यान त्याने चोरी केलेले सोन्याचे दागिने हे आरोपीत नामे.मोतीलाल सोनी, रा.वसंतविहार, ठाणे यास विक्री केले असल्याचे निष्पन्न झाल्याने, नमुद आरोपीतास प्रस्तुत गुन्हयात दि.३०/०४/२०२४ रोजी अटक करुन, नमुद दोन्ही आरोपीत यांचेकडून- १)एकुण- **३९५.०० ग्रॅम सोन्याचे दागिने**, असा **एकुण- २७,६५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत केला आहे.

नमुद आरोपीत नामे. **सोनु शेख, वय-४३ वर्षे,** हा सराईत असुन, त्याचेवर मुंबई व ठाणे शहरात वेगवेगळया पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली **एकुण-०५ गुन्हे** दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोलीस उप निरीक्षक/अविनाश हाटखिळे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.